**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर**

सचिव कार्यालय
दिनांकः- ७/८/२००८

**प्रति,**

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **क्र.९ सोमवार दिनांक ११/८/२००८ दुपारी १.००** वाजता स्थायी समिती कार्यालयात खालील विषयावर विचार - विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण सर्वांनी उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ९**

**सन-२००८-२००९**

**सोमवार दिनांक. ११/८/२००८ ची विषय पत्रिका.**

**विषय क्रं.** **विषय**

१. मा.स्थायी समिती समिती सभा क्रमांक ८ मंगळवार दिनांक २९/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

२. अहमदनगर महानगरपालिकेमार्फत बसविण्यांत येणा-या श्री.संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा पुरवठया करितां शिल्पकार परदेशी आर्ट स्टुडीओ पुणे यांना पुतळा किंमतीच्या पन्नास टक्के अग्रीम रक्कम देणेस व शिल्पकार एजन्सी बरोबर केलेल्या करारनाम्यात बदल करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

३. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ मधील केडगांव नवीन गावठाण अंतर्गत ते नगर -पुना रोड संदिप हॉटेल जवळील नाल्यापर्यत ३०० व ४५० एम.एम. आर.सी.सी पाईप गटर करणे चे काम मागासवर्गीय कल्याणकारी निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १८,१८,७१४/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

४. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ मध्ये केडगांव मोतीबाग नगर येथे कुस्ती संकुल बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २३,९७,०००/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

५. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १० मधील वारूळाचे मारूती कडे जाणा-या रस्त्यावरील सिना नदीवर पुल बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २६,८४,२७७/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

६. मा.कमान्डंट आर्मड स्टॅटिक वर्कशॉप ई.एम.ई यांना गोविंदपुरा भागातील संरक्षण विभागाचे मालकीच्या जागे मधून ड्रेनेज लाईन टाकणे साठी जागेचा वापर करण्यापोटी वार्षिक रूपये ६,९१२/-जागा भाडयापोटी अदा करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

७. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १० मधील आयुर्वेद कोपरा रोड ते काटवन खंडोबा रोड ते संजय नगर झोपडपट्टी पर्यत खडीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ एस्टीमेंट रूपये १७,८६,४००/-]

८. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व ५४(२) अन्वये डॉ.श्री. दर्शन विठ्ठल गोरे यांची (ऑनररी नेत्रतज्ञ) म्हणून नवीन पेठ दवाखाना येथे दरमहा मानधन रूपये १५००/- चे मानधनावर सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व त्याकामी येणारे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ मंगळवार दिनांक २९/७/२००८ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत व विषय-क्रमांक २ ते ८ च्या प्रस्तावांच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-९**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- १ सोमवार दिनांक ११/८/२००८
ठराव क्रमांक -१ सोमवार दिनांक ११/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ मंगळवार दिनांक २९/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ मंगळवार दिनांक २९/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.
सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.
हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.
मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक २९/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे. मा.सदस्यांनी त्याबाबत आपल्या सुचना दुरूस्त्या सांगाव्यात.
मा.श्री. शिंदे द.बा.:- मागिल सभेचे कार्यवृत्त मंजूर करावे.
मा.सौ. खरपुडे ज.सु.:- मंजूर करावे.
मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक २९/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.
**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ मंगळवार दिनांक २९/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.
सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-९**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- २ सोमवार दिनांक ११/८/२००८

ठराव क्रमांक -२ सोमवार दिनांक ११/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमार्फत बसविण्यांत येणा-या श्री. संभाजी महाराज यांच्या पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा पुरवठया करिता शिल्पकार परदेशी आर्ट स्टुडिओ, पुणे यांना पुतळा किंमतीच्या पन्नास टक्के अग्रीम रक्कम देणेस व शिल्पकार एजन्सी बरोबर केलेल्या करारनाम्यात बदल करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- टिप्पणी-**विषय**-अहमदनगर महानगरपालिका श्री.संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा पुरवठा करिता शिल्पकार एजन्सी यांना पुतळा किंमतीच्या ५०% अग्रीम रक्कम व पुतळयाचे क्ले ब्रांझमध्ये रूपांतरीत करणेसाठी कार्यादेश देणेबाबत.

**संदर्भ :-** १) परदेशी आर्टस् स्टुडिओ,पुणे यांचे दि. १० जुन २००८ चे पत्र.
२) मा.आयुक्त साहेब यांचे दालनामध्ये दि. १६/७/२००८ रोजी झालेल्या.
मा.पदाधिकारी व अधिकारी समन्वय बैठकीतील निर्णय.

सादर,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा.स्थायी समिती ठराव क्र. ३ दि. १६/२/२००८ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे प्रेफेसर कॉलनी येथील चौकात श्री.संभाजी महाराज यांचा उभा पुर्णाकृती ब्रांझ पुतळा उभारणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दर मे. एस.बी. परदेशी आर्टस् स्टुडिओ, पुणे यांचे श्री. संभाजी महाराज यांचा उभा पुर्णाकृती ब्रांझ पुतळा साईज- १२'.६" करिताचे रूपये १०,७०,०००/-( रूपये दहा लाख सत्तर हजार फक्त ) चे दरास मंजूरी देण्यात येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असा पारित झालेला आहे.

शिल्पकार एजन्सी मे. एस.बी.परदेशी आर्टस् स्टुडिओ, पुणे यांनी करून दिलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती पैकी-

१६) पुतळयाचे क्ले मॉडेल तयार करून मा.कलासंचालनालयाची मान्यता घेणेची जबाबदारी आमची राहील. कलासंचालनालयाचे मंजूरीसह प्रस्ताव मान्यतेसाठी मनपा मार्फत मा.शासनास सादर केला जाईल. शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पुतळयाचे क्ले मॉडेल ब्रांझमध्ये रूपांतरीत करणेसाठी स्वतंत्र कार्यादेश व पुतळा किंमतीच्या ५०% ( रू. ५,३५,०००/-फक्त) रक्कम अग्रीम म्हणून दयावी लागेल.

मे.एस.बी.परदेशी आर्टस् स्टुडिओ, पुणे यांनी दि. १० जून २००८ चे पत्रान्वये या पुढील काळात पुतळयाचे क्ले मॉडेल सांभाळणे अत्यंत अवघड काम असल्याने आपल्या पुर्वीच्या कार्यादेशानुसार मला पुढील कार्यवाही करणेसाठी ५०% आगावू रक्कम अदा केल्यास पुढील काम त्वरीत सुरू करता येईल तरी आपण करारपत्रातील शर्ती अटी ( अट क्र.१६) सवलत देवून मला पुढील काम करण्यास सहकार्य दयावे अशी विनंती आहे. आपण करारपत्रात दुरूस्ती करून मला ५०% आगावू रक्कम अदा केल्यास आपल्या ठरलेल्या वेळेत काम पुर्ण करणे शक्य होईल त्यानंतरचे पेमेंट कामाच्या ठरलेल्या व झालेल्या प्रगतीनुसार समक्ष पाहून देण्यात यावे असे कळविले आहे.

दि. १६/७/२००८ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे दालनामध्ये मा.पदाधिकारी व मा.अधिकारी समन्वय बैठकीत चर्चा होवून करारनामा दुरूस्ती व ५०% अग्रीम रक्कम देणे बाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करणेबाबत चा निर्णय झालेला आहे.

शिल्पकार एजन्सी एस.बी. परदेशी आर्टस् स्टुडिओ,पुणे यांना करारनाम्यातील अट क्र.१६ मध्ये शासनाची मंजूरी प्राप्त होण्यापुर्वी पुतळयाचे क्ले मॉडेल ब्रांझ मध्ये रूपांतरीत करणे साठी स्वतंत्र कार्यादेश व पुतळा किंमतीच्या ५०% ( रक्कम रू. ५,३५,०००/- फक्त) रक्कम अग्रीम म्हणून दयावी लागेल असा बदल करून कार्यवाही करणेस व घेतलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजन शिल्पकार एजन्सी यांनी पुतळा चबुत-यावर बसवून सर्व कामकाज पुर्ण केल्यावर अंतीम देयक सादर केल्यानंतर करता येईल.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की, पुतळा किंमती ५०% रक्कम अग्रीम म्हणून मंजूर करणेस व मा.स्थायी समितीचे निर्णयार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रस्तावीतनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,करारात बदलाचा मसुदा तयार करूनच स्थायी समितीची मंजूरी घ्यावी.

त्याप्रमाणे करारात बदलाचा मसुदा खालीलप्रमाणे सादर केला.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**करारनामा**

करारनामा लिहून घेणार :- मा. उपायुक्त (कर)
अहमदनगर महानगरपालिका.

करारनामा लिहून देणार :- मे.एस.बी.परदेशी आर्टस् स्टुडिसो,
सुखसागर नगर भाग-२
कोंडवा (ब्रु), पुणे-४८.

कारणे करारनामा लिहून देतो की, मा.स्थायी समिती ठराव क्र. दि. / /२००८ चे मंजूरी अन्वये श्री.संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा साईज-१२'६" पसंत लहान नमुना मॉडेल प्रमाणे-१ नग पुरवठा टेंडर च्या मूळ करारनाम्यातील अटी शर्ती मधील क्र. १६ ते १८ मध्ये खालील प्रमाणे बदल करण्याचे मान्य करीत आहे. उर्वरित अटी व शर्ती कायम राहतील.

**<u>मूळ करारनाम्यातील अटी व शर्ती मधील क्र. १६ :-</u>** पुतळयाचे क्ले मॉडेल तयार करून मा. कलासंचालनालयाची मान्यता घेणेची जबाबदारी आमची राहील. कलासंचालनालयाचे मंजूरीसह प्रस्ताव मान्यतेसाठी मनपामार्फत मा.शासनास सादर केला जाईल. शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पुतळयाचे क्ले मॉडेल ब्रांझमध्ये रूपांतरीत करणेसाठी स्वतंत्र कार्यादेश व पुतळा किंमतीच्या ५०% ( रू. ५,३५,०००/-फक्त) रक्कम अग्रीम म्हणून दयावी लागेल ही रद्द करण्यात येत आहे.

त्याऐवजी

**<u>करारात बदलाचा मसूदा अटी व शर्ती मधील क्र. १६ :-</u>** पुतळयाचे क्ले मॉडेल तयार करून मा. कलासंचालनालयाची मान्यता घेणेची जबाबदारी आमची राहील. कलासंचालनालयाचे मंजूरीसह प्रस्ताव मान्यतेसाठी मनपामार्फत मा.शासनास सादर केला जाईल. शासनाची मंजूरी प्राप्त होण्यापुर्वी पुतळयाचे क्ले मॉडेल ब्रांझमध्ये रूपांतरीत करणेसाठी स्वतंत्र कार्यादेश व पुतळा किंमतीच्या ५०%(रू.५,३५,०००/-फक्त) रक्कम अग्रीम म्हणून दयावी लागेल.

**<u>मूळ करारनाम्यातील अटी व शर्ती मधील क्रं. १७ :-</u>** पुतळयाचे ब्रांझ मध्ये रूपांतर पुर्ण झाल्यानंतर ग्राईडिंग, वेल्डींग व फिनिर्शिगनंतर मा. महापौर साहेब यांचे अध्यक्षतेखालील समितीने पुतळयाचे पसंती दर्शविल्यानंतर पुतळा किंमतीच्या ३०%( रू. ३,२१,०००/-फक्त) रक्कम अग्रीम म्हणून दयावी लागेल ही रद्द करण्यात येत आहे.

**<u>मूळ करारनाम्यातील अटी व शर्ती मधील क्र.१८ :-</u>** उर्वरित किंमतीच्या २०% (रू. २,१४,०००/-फक्त) रक्कम पुतळा नियोजीत जागेवर प्रतिष्ठापना करून पुर्ण कामकाज झाल्यानंतर अदा करावी लागेल. ही रद्द करण्यात येत आहे.

अट क्र. १७ व १८ ऐवजी

**<u>करारात बदलाचा मसूदा अटी व शर्ती मधील क्रं. १७ + १८ :-</u>** महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक स्मारक-३१०२ /८८४/प्र.क्र.१२२/२००२/२९ मंत्रालय मुंबई-४०००३२ दि.२ फेब्रुवारी २००५अन्वये पुतळा उभारणीस मा.शासनाची अंतीम मान्यता मिळाल्यानंतर निविदेतील मंजूर सर्व निकशानुसार श्री. संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती उभा तयार झालेल्या ब्रांझ पुतळा महानगरपालिकेचा लेखी आदेश प्राप्त झाल्यानंतरच स्वखर्चाने अहमदनगर शहरात पोहोच पुरवठा करून पुतळा नियोजित जागेवर चबुत-यावर स्वखर्चाने प्रतिष्ठापना करून पुर्ण कामकाज झाल्यानंतर अंतिम देयक सादर केल्यानुसार किंमतीच्या उर्वरित ५०%(रक्कम रू.५,३५,०००/- फक्त) अदा करावी लागेल. दरम्यानच्या काळात कोणतीही अग्रीम रक्कमेची मागणी केली जाणार नाही.

येणे प्रमाणे हा करारनामा राजीखुशीने व अक्कल हुशारीने लिहुन दिला असे.

करारनामा लिहुन देणार

साक्षीदार

१) स्वाक्षरी
नाव-
पत्ता-

२) स्वाक्षरी
नाव-
पत्ता-

मा.स्थायी समिती सदस्य

मा.स्थायी समिती सदस्य

करारनामा लिहुन घेणार
उपायुक्त (कर)
अहमदनगर महानगरपालिका

यावर मा.उपायुक्त (कर) यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अट क्र.१७,१८ वगळून प्रस्ताव मान्येतसाठी स्थायी समितीस सादर करा.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख करितां श्री. ए.जी. जाधव यांचा अहवाल असे. दि. २५/७/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमार्फत बसविण्यांत येणा-या श्री. संभाजी महाराज यांच्या पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा पुरवठया करिता शिल्पकार परदेशी आर्ट स्टुडिओ, पुणे यांना पुतळा किंमतीच्या पन्नास टक्के अग्रीम रक्कम देणेस व शिल्पकार एजन्सी बरोबर केलेल्या करारनाम्यात बदल करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- श्री. संभाजी महाराज यांचे उभा ब्रांझ पुतळयाचे पुरवठया करितां शिल्पकार यांना अग्रीम रक्कम देणे व करारनाम्यामध्ये बदल करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- आपण संबंधीत शिल्पकारास अग्रीम रक्कम दिल्यास ते सदरचे पुतळयाचे काम वेळेत पुर्ण करणार का? त्यांना किती अग्रीम देणे आहे.

मा.सभापती साहेब :- पुतळा किंमतीच्या पन्नास टक्के म्हणजे पांच लाख पस्तीस हजार रूपये शिल्पकार यांना अग्रीम रक्कम म्हणून अदा करावयाची असून सदर रक्कम त्यांना अदा केल्यास ते वेळेत काम पुर्ण करण्यांस तयार आहेत. त्याप्रमाणे करारनाम्या मध्ये ही दुरूस्ती करणेस, कार्यादेश देणेस परवानगी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा काम लवकरात लवकर व्हावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेमार्फत बसविण्यांत येणा-या श्री. संभाजी महाराज यांचे पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा पुरवठया करिता शिल्पकार मे.एस.बी. परदेशी आर्ट स्टुडिओ, पुणे यांना पुतळा किंमतीच्या पन्नास टक्के रक्कम रूपये ५,३५,०००/-( रूपये पांच लाख पस्तीस हजार फक्त) अदा करणेस व सदरचे शिल्पकार एजन्सी बरोबर केलेल्या करारनाम्यात बदल करून त्यांना पुतळयाचे क्ले मॉडेल ब्रांझ मध्ये रूपांतरीत करणेसाठी स्वतंत्र कार्यादेश देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत करावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**

सन २००८-२००९.

ठराव क्रमांक :-३ सोमवार दिनांक ११/८/२००८

विषय क्रमांक :-३ सोमवार दिनांक ११/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ मधील केडगांव नवीन गावठाण अंतर्गत ते नगर-पुना रोड संदिप हॉटेल जवळील नाल्यापर्यत ३०० व ४५०एम.एम. आर.सी.सी पाईप गटर करणे चे काम मागासवर्गीय कल्याणकारी निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १८,१८,७१४/-चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव नवीन गावठाण येथील अंतर्गत ते नगर-पुना रोड संदिप हॉटेल जवळील नाल्यापर्यत ३०० व ४५० एम.एम. आर.सी.सी पाईप गटर करणे.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की,प्रभाग क्र.७ मध्ये केडगाव नवीन गावठाण येथील अंतर्गत ते नगर-पुनारोड संदिप हॉटेल जवळील नाल्यापर्यत३००व४५०एम.एम.आर.सी.सी पाईप गटर करणेचे काम मा.महापौर साहेब यांनी इकडेस यादी देउन सदर काम मागासवर्गीय कल्याणकारी निधीतुन करणेचे सुचित केलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याकरिता गटारीची व्यवस्था नाही. त्यामुळे सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याकरीता ३०० व ४५० एम.एम. आर.सी.सी. पाईप गटर करणेचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-०८ च्या म.जि.प्रा.च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १८,१८,७१४/- इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः- प्रभाग क्रमांक७मधील केडगांव नवीन गांवठाण येथे आर.सी.सी.गटर करणेचे काम मागासगर्वीय कल्याणकारी निधीतुन करणेस व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.सौ. कांबळे मं.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा काम लवकरात लवकर व्हावे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. दिघे वि.रा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ मधील केडगांव नवीन गावठाण अंतर्गत ते नगर-पुना रोड संदिप हॉटेल जवळील नाल्यापर्यत ३०० व ४५०एम.एम. आर.सी.सी पाईप गटर करणे चे काम मागासवर्गीय कल्याणकारी निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १८,१८,७१४/- (रूपये आठरा लाख आठरा हजार सातशे चौदा फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालि का, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
सन २००८-२००९.

ठराव क्रमांक :- ४ सोमवार दिनांक ११/८/२००८

विषय क्रमांक :-४ सोमवार दिनांक ११/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ मध्ये केडगांव मोतीबाग नगर येथे कुस्ती संकुल बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २३,९७,०००/-चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना- कामाचे नांव :- प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव मोतीबाग नगर येथे कुस्ती संकुल बांधणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, केडगाव स.नं. ४२२ मोतीबाग नगर येथे कुस्ती संकुल उभारणेबाबत मा. महापौर साहेब यांनी आदेश दिले होते. तसेच कुस्ती संकुल उभारणेबाबत महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत २ ठराव करण्यात आले आहेत.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी करून कुस्ती संकुल करणे बाबत सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २३,९७,०००/-इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ७ मध्ये केडगांव मोतीबाग नगर येथे कुस्ती संकुल बांधणेचे कामास व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदरचे कामाकरितां आवश्यक खर्चाची तरतुद शिल्लक आहे का?

अं.ले.परिक्षक श्री. गोरे पी.आर.:- होय तरतुद आहे.

मा.सौ.कांबळे मं.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा काम लवकर व्हावे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ मधील केडगांव मोतीबाग नगर येथे कुस्ती संकुल बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २३,९७,०००/-(रूपये तेवीस लाख सत्याण्णव हजार फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
सन २००८-२००९.

ठराव क्रमांक :-५ सोमवार दिनांक ११/८/२००८

विषय क्रमांक :-५ सोमवार दिनांक ११/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १० मधील वारूळाचे मारूती कडे जाणा-या रस्त्यावरील सिना नदीवर पूल बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २६,८४,२७७/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना- विषय- प्र.क्र. १० मधील वारूळाचा मारूतीकडे जाणा-या रोडवरील सिना नदीवर पूल बांधणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, मा.नगरसेवक श्री. भानुदास एकनाथ कोतकर यांनी दि. १५/४/०८ रोजी यादी देवून वरील विषयाचे काम करणे बाबत सुचविले आहे.

त्यानुसार सदर भागाची समक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत असलेला पूल हा नादुरूस्त झालेमुळे तसेच पावसाळयातील दिवसात नदीला जास्त प्रमाणात पाणी असते त्यामुळे नागरिकांना शहराशी संपर्क तुटतो परिणामी नागरिकांच्या सोयीसाठी सदर ठिकाणी नवीन पूल बांधणे आवश्यक असल्यामुळे सार्व.बांधकाम विभाग यांचे कडून सदर पूल बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सन २००७-०८ चे दरसुचीनुसार सदर कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रू. २६,८४,२७७/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ व निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १० मधील वारूळाचे मारूती कडे जाणा-या रस्त्यावरील सीना नदीवर पुल बांधणेचे कामास व खर्चास मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदर कामाबाबत यादी कुनी दिलेली आहे.

मा.सभापती साहेब :- सदर कामाबाबत मा.सदस्य श्री. कोतकर भा.ए. यांनी यादी दिलेली आहे.

मा.सौ. पवार सं.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १० मधील वारूळाचे मारूती कडे जाणा-या रस्त्यावरील सिना नदीवर पूल बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये२६,८४,२७७/-(रूपये सव्वीस लाख चौ-याऐंशी हजार दोनशे सत्त्याहत्तर फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
सन २००८-२००९.

ठराव क्रमांक :-६ सोमवार दिनांक ११/८/२००८

विषय क्रमांक :-६ सोमवार दिनांक ११/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.कमान्डंट आर्मड स्टॅटिक वर्कशॅाप ई.एम.ई. यांना गोविंदपुरा भागातील संरक्षण विभागाचे मालकीच्या जागे मधून ड्रेनेज लाईन टाकणे साठी जागेचा वापर करण्यापोटी वार्षिक रूपये ६,९१२/- जागा भाडयापोटी अदा करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना- **विषय-** गोविंदपूरा भागातील संरक्षण विभागाच्या मालकीच्या जागेमधून ड्रेनेज लाईन टाकण्यास परवानगी मिळणे बाबत.

**संदर्भ :-** C/o. 56 APO 58 COY ASC (SYP)Type B ५ July चे पत्र.

गोविंदपूरा भागाच्या पुर्वेला संरक्षण विभागाची जागा आहे. आजमितीस गोविंदपूरा भागातील सांडपाणी उघडया नाल्यातुन संरक्षण विभागाच्या मालकीच्या जागेमधून वाहत आहे. या सांडपाण्याच्या प्रवाहाला संरक्षण विभागाने हरकत घेतली आहे. तद्नंतर सदर ड्रेनेज लाईन रस्त्याच्या कडेने घेवून अस्थित्वातील नाल्यात सोडण्यास संरक्षण विभागाने तत्वतः मान्यता दिलेली आहे. तथापी संरक्षण विभागातील जागेचा वापर करण्यापोटी त्यांनी १/४/०६ ते ३१/३/०९ अखेर च्या STR Rate प्रमाणे प्रती वर्ष भाडे रू. ६,९१२/- भुईभाडे आकारण्यात येईल किंवा रू. २,७६,४८०/ इतके त्या जागेची किंमत दाखविली आहे.

गोविंदपूरा भागातील सांडपाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता प्रती वर्ष रक्कम रू. ६,९१२/- भाडेपोटी मा. कमान्डंट, आर्मड स्टॅटिक वर्कशॉप, ई.एम.ई. यांना अदा करावी लागेल. तरी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये् वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये् झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- गोविंदपुरा भागातील संरक्षण विभागाचे जागे मधून ड्रेनेज लाईन टाकणे साठी जागेचा वापर करण्यापोटी त्यांना वार्षिक भाडे अदा करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. दिघे वि.रा.:- सदर जागा भाडयाने घेतल्यास तीन वर्षा साठी प्रश्न मिटेल परंतु पुन्हा जागे संबंधी प्रश्न निर्माण होईल. भाडे वाढवून द्यावे लागेल. त्याकरिता सदर जागा खरेदी करणेत यावी.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- जागा खरेदी केल्यास जागेवरील त्यांचा वावर बंद करावा लागेल.

मा.सौ.दिघे वि.रा.:-सध्याच ते गटारीचे पाणी तेथून जाउ्र देत नाहीत.त्यासाठी जागा खरेदी करण्यांत यावी.भाविष्यातील अडचणी त्यामुळे उद्‌भवणार नाहीत.जागा खरेदी न दिल्यास दहा वर्षाकरितां भाडयाने घेण्यांत यावी.

मा.श्री. शिंदे द.बा.:- सदर जागा विकत घेतल्यास फायदेशीर होईल.

मा.श्री.मैड स.ब.:-जागा दहा वर्षासाठी भाडे कराराने घेण्यात यावी.अगर जागा विकत दिल्यास ती खरेदी करणेत यावी.

मा.श्री. तिवारी सु.र.:- दहा वर्षासाठी भाडे करार करावाअन्यथा जागा खरेदी करावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- जागा खरेदीस अगर भाडे कराराने घेणेस मंजूरी देण्यात यावा.

मा.उपायुक्त श्री.जावळे साहेब :-जागा खरेदीस प्राधान्य द्यावे.अगर दहावर्षासाठी भाडेकराराने जागा घेण्यांत द्यावी.

मा.श्री. शिंदे द.बा.:- खरेदी करावी अगर दहा वर्षाचे भाडे कराराने जागा भाडयाने घेणेस मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- जागा खरेदी देत असल्यास जागा प्राधान्याने खरेदी करण्यात यावी. अगर दहा वर्षासाठी जागा भाडयाने घेणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात यावी.

**प्रस्तावाचा विषय :-** मा.कमान्डंट आर्मड स्टॅटिक वर्कशॅाप ई.एम.ई. यांना गोविंदपुरा भागातील संरक्षण विभागाचे मालकीच्या जागे मधून ड्रेनेज लाईन टाकणे साठी जागेचा वापर करण्यापोटी वार्षिक रूपये ६,९१२/- जागा भाडयापोटी अदा करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**ठराव :-** मा.कमान्डंट आर्मड स्टॅटिक वर्कशॅाप ई.एम.ई. यांनी गोविंदपुरा भागातील संरक्षण विभागाची जागा ड्रेनेज लाईन टाकणेसाठी खरेदी दिल्यास सदर जागा प्राधान्याने खरेदी करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर जागा खरेदी करणे कामी येणारे रक्कम रूपये २,७६,४८०/-(रूपये दोन लाख शहात्तर हजार चारशे ऐंशी फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. मात्र सदर जागा खरेदी देणेस मा.कमान्डंट आर्मड स्टॅटिक वर्कशॅाप ई.एम.ई. यांनी नकार दिल्यास सदर जागा दहा वर्षाचे मुदती करितां गोविंदपुरा भागातील ड्रेनेज लाईन टाकणे साठी भाडे कराराने घेण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा. सौ. दिघे विमल रामचंद्र.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.
ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
सन २००८-२००९.

ठराव क्रमांक :-७ सोमवार दिनांक ११/८/२००८

विषय क्रमांक :-७ सोमवार दिनांक ११/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १० मधील आयुर्वेद कोपरा रोड ते काटवन खंडोबा रोड ते संजय नगर झोपडपट्टी पर्यत खडीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ एस्टीमेंट रूपये १७,८६,४००/-]

**प्रस्तावाचा मजकुर :-** -विषय-निविदा मंजुरी बाबत.

**कामाचे नांव :-** प्रभाग क्र. १० आयुर्वेद कोपरा रोड ते काटवन खंडोबा रोड ते संजयनगर झोपडपट्टी पर्यत खडीकरण व डांबरीकरण करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :-मा.आयुक्त साहेब यांनी दि.२१/९/०७ अन्वये कामास मंजुरी.
२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- १७,८६,४००/-
३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- १७,८६,४००/-
४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-२००८
५] निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- १७,०१,३१३/-
६] निविदा प्रसिध्दी तारीख :- ६/६/२००८ दै.पुण्यनगरी
७] निविदा विक्री कालावधी :- ६/६/२००८ ते १३/६/०८ (पंधरा दिवस)
८] निविदा स्विकारण्याची तारीख :- १८/६/२००८
९] निविदा उघडण्याची तारीख :- २६/६/२००८
१०]कामाची मुदत :- ५ महिने
११]प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन | ४० % जादा |
| २ | मे.ए.सी. शेख | १.३२% जादा |
| ३ | श्री. एम.व्ही.दराडे | ५५ % जादा |
| ४ | मे.ए.सी. कोठारी | ३५ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.ए.सी. शेख यांचा देकार सर्वात कमी म्हणजे १.३२%जादा आहे.सदर प्रस्ताव दि. ११/७/०८रोजी छाननी समितीसमोर ठेवला असता ठेकेदाराचा निविदा रकमेपेक्षा १.३२% जादा दर मंजूरीबाबत शिफारस करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू. १७,२३,७७०/- |
| २ | चालु दरसुची सन . ०७-०८अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू १७,०१,३१३/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक (१-२) | रू. २२,४५७/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ X १००) / २ | १.३२ % जादा |
| ५ | शेरा / अभिप्राय | खालीलप्रमाणे |

त्यानुसार सन २००७-०८ चे सुधारित दरसुचीनुसार करता ठेकेदाराचा देकार १.३२ % जादा येत आहे. सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- वॉर्ड क्रमांक १० मधील खडीकरण व डांबरीकरणाचे आलेले निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.खरपुडे ज.सु. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १० मधील आयुर्वेद कोपरा रोड ते काटवन खंडोबा रोड ते संजय नगर झोपडपट्टी पर्यत खडीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदादर धारक मे.ए.सी.शेख यांचे सन २००७-२००८ चे सुधारित दर सुचीनुसार १.३२ % ( एक पुर्णांक बत्तीस शतांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**

सन २००८-२००९.

ठराव क्रमांक :-८ सोमवार दिनांक ११/८/२००८

विषय क्रमांक :-८ सोमवार दिनांक ११/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व ५४ (२)अन्वये डॉ.श्री. दर्शन विठ्ठल गोरे यांची ऑनररी नेत्रतज्ञ म्हणून नवीन पेठ दवाखाना येथे दरमहा मानधन रूपये १५००/-चे मानधनावर सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व त्याकामी येणारे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- डॉ. दर्शन विठ्ठल गोरे ( ऑनररी नेत्रतज्ञ) यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक करणे बाबत.

मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे प्रस्तावाप्रमाणे आस्थापना सुचीवर नेत्रतज्ञाचे पद मंजुर नसुन तेत्रज्ञ डॉक्टरांची (ऑनररी नेत्रतज्ञ)म्हणुन मानधनावर नेमणुक करावी लागते. डॉ.गोरे यांची सहा महिन्याच्या कालवधीची तात्पुरती नेमणुक समाप्त झालेली आहे. नवीपेठ दवाखान्यामध्ये गरीब व गरजु रूग्णांना अल्प दरात औषधोपचाराची सोय झालेली आहे. यापुर्वी डॉ.गोरे यांना दरमहा रू.१५००/- मानधनावर आठवडयातुन दोनदा मंगळवार व शुक्रवार रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत काम करण्याचे आदेश दिलेले होते.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) व ५४ (२)अन्वये ६ महिन्याकरिता डॉ.गोरे यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुक करणेस व त्याकामी येणा-या रूपये ९,०००/- च्या खर्चास मंजूरी बाबतचा विषय मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवणेस मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख श्री. व्हि.एस. थोरात यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नेत्रतज्ञ म्हणून डॉ.श्री. दर्शन गोरे यांची मानधनावर नेमणूक करणेस व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्टास मंजूरी देण्यात यावी.

म.सभापती साहेब :- डॉ. गोरे यांना पुर्वी नेत्रतज्ञ म्हणून नेमणूक दिलेली आहे का?

मा.उपायुक्त श्री. जावळे साहेब :- होय त्यांची पुर्वी सहा महिन्याकरिता नेमणूक केली होती.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व ५४(२) अन्वये डॉ.श्री. दर्शन विठ्ठल गोरे यांची ऑनररी नेत्रतज्ञ म्हणून नवीन पेठ दवाखाना येथे दरमहा मानधन रूपये १५००/- (रूपये एक हजार पाचशे फक्त) चे मानधनावर सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व त्याकामी येणारे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.